महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य, सेवा, गट-अ मधील संचालक, आरोग्य सेवा (१) मुंबई या पदावर नामनिर्देशनाने नियुक्तीबाबत...

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः नामानि-१४१८/प्र.क्र.१५४/सेवा-२
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत, १० वा मजला
मंत्रालय, मुंबई-४०० ००१
तारीख: १९ ऑगस्ट, २०१९

वाचा : १) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय, क्रमांक-पदस्था-१३१५/प्र.क्र.५०/सेवा-२, दि. ०९.०१.२०१७

२) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय, क्रमांक-संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१११/आरोग्य-३, दि ०६.०३.२०१९

३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र. ४८२(५३)/२३२५/पंधरा-अ,दि. ०४.०७.२०१९

<u>शासन निर्णय -</u>

संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील आरोग्य सेवा संचालनायातर्गत सहसंचालक, आरोग्य सेवा या संवर्गातील एक पद दर्जोन्नत करुन संचालक, आरोग्य सेवा असे एक वाढीव पद निर्माण करण्यात आले आहे. संचालक आरोग्य सेवा हे अतिरिक्त पद नव्याने निर्माण करण्यात आले असल्याने राज्यस्तरावर संचालक, आरोग्य सेवा-१ व संचालक, आरोग्य सेवा-२ अशी दोन पदे निर्माण झाली आहेत. संचालक, आरोग्य सेवा (१) चे मुख्यालय मुंबई हे असून, संचालक, आरोग्य सेवा (२) चे मुख्यालय पुणे येथे आहे. सदर पदांच्या कामकाजाची विभागणी संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे.

संदर्भ क्र. ३ अन्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतन मॅट्रीक्समधील वेतन स्तर एस - २९ : १३११००-२१६६००) मधील संचालक, आरोग्य सेवा (१) मुंबई या पदावर डॉ. (श्रीमती) साधना शरदचंद्र तिडके, (ओबीसी) यांची खुल्या प्रवर्गातून शिफारस करण्यात आली आहे. त्यानुसार डॉ. (श्रीमती) साधना शरदचंद्र तिडके (तायडे) यांची संचालक, आरोग्य सेवा (१) मुंबई या पदावर नामनिर्देशनाने खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून नियुक्ती करण्यात येत आहे.

१) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ संवर्गातील संचालक, आरोग्य सेवा या पदाचा कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून दोन वर्ष इतका कालावधी हा परिविक्षा कालावधी राहील. परिविक्षाधीन कालावधीत त्यांनी अपेक्षित दर्जा प्राप्त न केल्यास किंवा वर्तणूक अयोग्य, अपेक्षित दर्जाचे अथवा असमाधानकारक आढळल्यास त्यांची सेवा संपुष्टात आणली जावू शकेल किंवा त्यांचा परिविक्षाधीन कालावधी आवश्यक त्या कालावधीसाठी वाढविला जाईल. अशा वाढलेल्या काळामध्ये त्याचे काम समाधानकारक झाले नाही तर, त्याची सेवा कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय संपुष्टात आणली जाईल. तसेच परिविक्षा कालावधीमधील प्रथम वेतनवाढ परिविक्षा कालावधीतील एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर एक वेतनवाढ अनुज्ञेय राहील. तसेच पुढील वेतनवाढ परिविक्षा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण झाल्यानंतर अनुज्ञेय होईल.

२) डॉ. (श्रीमती) साधना शरदचंद्र तिडके यांनी त्यांच्या नावाची नोंदणी महाराष्ट्र वैद्यकीय व्यावसायिक अधिनियम, १९६१ अथवा महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५ खाली या नियुक्तीपूर्वी केली असली पाहिजे किंवा भारतीय वैद्यकीय नोंदवही मध्ये नियुक्तीपूर्वी नोंद झाली असली पाहीजे.

३) सदर उमेदवारास शासकीय सेवेचा राजीनामा द्यावयाचा असेल किंवा शसकीय नोकरी अन्य कोणत्याही मार्गाने सोडायची असेल तर, त्यांने शासनाला कमीत कमी एक महिन्याची पूर्वसूचना दिली पाहीजे. अथवा एक महिन्याची आगाऊ वेतनपूर्ती केल्या शिवाय सेवेतून निवृत्त होता येणार नाही.

४) त्यांना त्यांचे सेवाकालावधीत केंद्र शासनाने विहित केलेल्या अटीवर चार वर्षाच्या कालावधीकरिता (प्रशिक्षण कालावधी धरुन) जरुर पडल्यास भारत संरक्षण किवा संरक्षण सेवेशी सबंधीत अशा पदावर काम करावे लागेल. हे दायित्व सेवेच्या पहिल्या दहा वर्षापर्यंत मर्यादित राहील व ४५ वर्षे वयानंतर सर्वसाधारणपणे लागू होणार नाही.

५) त्यांना शासन विहित करील त्याप्रमाणे प्रशिक्षण पार पाडावे लागेल.

६) त्यांनी हिंदी आणि मराठी भाषा परिक्षेसंबधीच्या नियमावलीनुसार जर ते या परीक्षा अगोदरच उत्तीर्ण झाले नसतील किंवा त्यांना उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर त्यांनी एतदर्थ मंडळाची मराठी/हिंदी भाषा परीक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

७) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि. ७.८.२००० अन्वये शासन सेवेतील नियुक्तीकरिता सगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान एक आवश्यक अर्हता म्हणून निश्चिती करण्यात आली आहे. त्यानुसार सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रश्क्षिण-२०००/प्र.क्र. ६१/२००१/३९, दि. १९.३.२००३ अन्वये आवश्यक प्रमाणपत्र आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचेकडे नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून विहित मुदतीत उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

८) सदर उमेदवाराचे वेतन मॅट्रीक्समधील वेतन स्तर एस-२९ : १३११००-२१६६०० असे राहील व त्यांना नियमानुसार अनुज्ञेय भत्ते देय राहतील.

९) सदर उमेदवारांचे वेतन महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील तरतुदीनुसार निश्चित केले जाईल.

१०) सदर पदाच्या निवडीकरिता सादर केलेल्या सर्व प्रमाणपत्रांची (जाती विषयक प्रमाणपत्रासह) सत्यासत्यता तपासण्यात येत आहे. यापैकी कोणतेही प्रमाणपत्र अवैध किवा खोटे, बनावट आढल्यास उमेदवाराचे नियुक्तीचे आदेश कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येतील. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांनी सदरहू उमेदवारांस रुजू करुन घेतेवेळी त्यांची सर्व प्रमाणपत्रे तपासून घ्यावीत.

११) सदर उमेदवारांस वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र. अंनियो-१००९/प्र.क्र. ३२/सेवा-४, दि. १८.८.२००९ मधील तरतूदीनुसार, दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी शासन सेवेत निवृत्तीवेतनार्ह आस्थापनेच्या पदावरील कार्यरत असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांचे त्याच किंवा अन्य विभागातील निवृत्तीवेतनार्ह आस्थापनेच्या पदावरील नियुक्तीसाठी दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर अर्ज केला असेल आणि त्याला दिनाक १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नवीन पदावर नियुक्त करण्यात आले असेल तर अशा प्रकरणी वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अंनियो-१००६/८७/सेवा-४, दि. १२ जानेवारी, २००७ मधील (i) ते (iv) येथे नमूद केलेल्या सर्व अटींची पूर्तता झाल्यास सबंधीत शासकीय कर्मचाऱ्यास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ व संर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू ठरतील. दि. १८.८.२००९ च्या परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे (i) ते (iv) येथील सर्व अटींची ज्याप्रकरणी पूर्तता होत नसेल, अशा शासकीय कर्मचाऱ्यास “नवीन परिभाषित अशदान निवृत्ती योजना” लागू ठरतील.

१२) डॉ. (श्रीमती) साधना शरदचंद्र तिडके हे यापूर्वी शासकीय सेवेत कार्यरत असल्याने त्यांच्याविरुध्द काही विभागीय चौकशी प्रलंबित अथवा प्रस्तावित असल्यास त्यांची नियुक्ती सदर विभागीय चौकशीच्या अधीन राहील.

१४) डॉ. (श्रीमती) साधना शरदचंद्र तिडके यांनी सदर आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत नियुक्ती स्विकारणे आवश्यक राहील. अन्यथा एक महिन्यानंतर सदर नियुक्तीचे आदेश आपोआपच रद्दबातल होतील.

१५) सदर नियुक्ती मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे दाखल केलेल्या मुळ अर्ज क्र. ४३३/२०१९, मुळ अर्ज क्र. २३०/२०१९ व मुळ अर्ज ५७३/२०१९ वरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८१९१५०६५६८४१७ असा आहे. हा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vishnudas Pundlikrao Ghodke

Digitally signed by Vishnudas Pundlikrao Ghodke
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=514c2e5ad6ac71c69b99a86a5fe5189556b7a95d5896bbb81496f403bb58ac3e, serialNumber=9ab69d6945f8950a9525831f8ae9726be295d17576e78d19fa8f6cb952bb04a0, cn=Vishnudas Pundlikrao Ghodke
Date: 2019.08.19 16:12:06 +05'30'

(वि. पुं. घोडके)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मुख्यसचिव , महाराष्ट्र राज्य, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४) सर्व विभागाचे सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
५) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई (पत्राने)
६) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
७) सर्व विभागीय आयुक्त
८) सर्व जिल्हाधिकारी
९) मुख्य कार्यकारी अधिकारी, महात्मा ज्योतिबा फुले जीवन विमा योजना, वरळी , मुंबई
१०) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
११) प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी, वडाळा , मुंबई
१२) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
१३) अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (सर्व)
१४) सहसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)
१५) उपसंचालक, आरोग्य सेवा,(सर्व)
१६) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र -१ , मुंबई / महाराष्ट्र -२ , नागपूर

१७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१ , मुंबई / महाराष्ट्र -२ , नागपूर
१८) जिल्हा शल्य चिकित्सक , सामान्य रुग्णालय (सर्व)
१९) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
२०) निवासी लेखा अधिकारी ,मुंबई
२१) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२२) खाजगी सचिव,मा.मंत्री (आरोग्य) / मा. राज्यमंत्री (आरोग्य), मंत्रालय, मुंबई
२३) मंत्रालयीन सर्व विभाग
२४) स्वीय सहायक, प्रधान सचिव (सा.आ.वि.)
२५) सर्व सहसचिव/उपसचिव सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे स्वीय सहायक
२६) सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय,मुंबई
२७) डॉ. (श्रीमती) साधना शरदचंद्र तिडके (तायडे), सहसंचालक,(श्रेणीअवनत) आरोग्य सेवा (असंसर्गजन्य रोग व अंधत्व व इतर)मुंबई
२८) निवड नस्ती (सेवा-२)